.nagpur

# NMC e NEWS LETTER

जून २०१९



पर्यावरण रक्षणासाठी लोकचळवळ उभारणे गरजेचे : महापौर

2

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/

## थोडक्यात...

### नागपूर महानगरपालिकेचा २०१९-२० या वर्षाचा प्रस्तावित अर्थसंकल्प सादर



नागपूर महानरपालिकेचा २०१९-२० या वर्षाचा प्रस्तावित अर्थसंकल्प स्थायी समिति सभापती प्रदीप पोहाणे यांनी बुधवारी (ता.२६) सभागृहामध्ये सादर केला. स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे यांनी ३१९७.६० कोटीचा प्रस्तावित अर्थसंकल्प सभागृहात मांडला.

### धनुर्विद्या प्रशिक्षण केंद्राचे भूमिपूजन



नागपूर : नागपूर जिल्हा धनुर्विद्या प्रशिक्षण केंद्राचे भूमिपूजन ओंकार नगरातील प्रा. अरुणराव कलोडे महाविद्यालयाजवळील नासुप्रच्या मैदानावर मनपाचे क्रीड सभापती नागेश सहारे यांच्या हस्ते पार पडले.यावेळी प्रभाग क्र. ३३ चे नगरसेवक नागेश मानकर, धनुर्विद्या संघटनेचे अध्यक्ष मुकुल मुळे, धनुर्विद्या प्रशिक्षक संजय कहुरके, काकासाहेब कऱ्हाडे, डॉ. गजभिये, श्री. गुप्ता व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चार नवीन सोनोग्राफी सेंटरला मंजुरी पीसीपीएनडीटी सल्लागार समितीची बैठक




नागपूर : पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत नागपूर शहरामध्ये चार नवीन सोनोग्राफी केंद्राला मंजुरी देण्यात आली आहे. नागपूर महानगरपालिकेच्या पीसीपीएनडीटी सल्लागार समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. धरमपेठ येथील मनपाच्या डिक दवाखान्यामध्ये सल्लागार समितीची बैठक घेण्यात आली.बैठकीत समितीच्या अध्यक्ष प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. वर्षा ढवळे, मनपाच्या पीसीपीएनडीटी नोडल अधिकारी डॉ. शिल्पा जिचकार, मनपाचे अतिरिक्त सहायक आरोग्य अधिकारी डॉ. विजय जोशी, डॉ. प्रशांत ओंकार, विधी अधिकारी व्यंकटेश कपले, जनसंपर्क अधिकारी प्रदीप खर्डेनवीस, वीणा खानोरकर, डॉ. वासंती देशपांडे आदी उपस्थित होते. बैठकीमध्ये नवीन सोनोग्राफी केंद्राच्या नोंदणीला मान्यता व जुन्या केंद्राच्या नुतनीकरणाच्या मान्यतेबाबत चर्चा करण्यात आली. यामध्ये चार नवीन सोनोग्राफी केंद्रांच्या मंजुरीसह सात सोनोग्राफी केंद्रांच्या नोंदणीचे नविनीकरण करण्यात येणार आहे.

### गार्गी चोपरा यांनी स्वीकारला मंगळवारी झोन सभापतीचा पदभार



नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या मंगळवारी झोन सभापतीपदी निवडून आलेल्या गार्गी चोपरा यांनी झोन सभापती म्हणून पदभार स्वीकारला. मावळत्या झोन सभापती संगीता गिऱ्हे यांनी गार्गी चोपरा यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करीत पदभार सोपविला.मंगळवारी झोन कार्यालय परिसरात आयोजित कार्यक्रमाला आमदार सुधाकर देशमुख, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, विरोधी पक्षनेते तानाजी वनवे, नागपूर सुधार प्रन्यासचे विश्वस्त भूषण शिंगणे, मंगळवारी झोनच्या नवनिर्वाचित सभापती गार्गी चोपरा, कर व कर आकारणी समिती सभापती संदीप जाधव, मावळत्या झोन सभापती संगीता गिऱ्हे, माजी स्थायी समिती सभापती नगरसेवक वीरेंद्र कुकरेजा, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, नगरसेवक संजय बुर्रेवार, निशांत गांधी, महेंद्र धनविजय, नगरसेविका प्रगती पाटील, सुषमा चौधरी, प्रमिला मंथरानी, ममता सहारे, अर्चना पाठक, मंगळवारी झोनचे सहायक आयुक्त हरीश राऊत आदी उपस्थित होते.

# भांडेवाडी डम्पिंग यार्ड कचरामुक्त होणार

## कचरा वर्गीकरण संयंत्राचे महापौर नंदा जिचकार आणि आमदार कृष्णा खोपडे यांच्या हस्ते लोकार्पण



नागपूर : पूर्व नागपुरातील भांडेवाडी डम्पिंग यार्डमधील कचऱ्यामुळे अनेक समस्यांना सामोरे जाणाऱ्या परिसरातील जनतेला कचऱ्याच्या समस्येपासून आता मुक्तता मिळणार आहे. नागपूर महानगरपालिकेने कचऱ्यापासून वीज बनविण्याच्या प्रकल्पांतर्गत भांडेवाडीत कचऱ्याचे वर्गीकरण सुरू केले आहे. कचरा वर्गीकरण करणाऱ्या संयंत्राचे लोकार्पण रविवारी (ता. १६) महापौर नंदा जिचकार आणि आमदार कृष्णा खोपडे यांच्या हस्ते करण्यात आले.या संयंत्राच्या माध्यमातून वर्गीकरण आणि प्रक्रिया करण्यात आलेल्या कचऱ्याला वीज निर्मितीसाठी जबलपूरला नेण्यात येणार आहे. लोकार्पण समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून महापौर नंदा जिचकार, आमदार कृष्णा खोपडे यांच्यासह स्थायी समितीचे सभापती प्रदीप पोहाणे, परिवहन समितीचे सभापती बंटी कुकडे, विधी समितीचे सभापती धर्मपाल मेश्राम, लकडगंज झोन सभापती राजकुमार शाहू, नेहरूनगर झोन सभापती समिता चकोले, अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख, एसएनडीएलचे महाव्यवस्थापक सुनील खुराणा, नगरसेविका मनिषा कोठे उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना आमदार कृष्णा खोपडे म्हणाले, या संयंत्राच्या माध्यमातून पूर्व नागपुरातील जनतेला कचऱ्याच्या समस्येपासून मुक्त करण्यास मदत मिळेल. सोबतच वातावरणही प्रदूषणमुक्त होईल. महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, सध्या १० एकर जागेला कचरामुक्त करण्यात येईल. त्यानंतर हळूहळू संपूर्ण परिसर कचरामुक्त होईल. नागपूर महानगरपालिकेने कचऱ्यापासून वीज निर्मिती करण्याचे कंत्राट एस्सेल इंफ्राप्रोजेक्टस लिमिटेड आणि हिताची जोशैन इंडिया प्रा.लि. कंपनीला दिले आहे. यावेळी भाजयुमोचे सचिन करारे, मनोज अग्रवाल, हर्षद घाटोळे, ईएसएसईएल चे अनिलकुमार, मनपाचे कार्यकारी अभियंता अनिरुद्ध चौगंजकर, उपअभियंता प्रशांत वाघमारे, स्वच्छ भारत अभियानचे नोडल अधिकारी डॉ. प्रदीप दासरवार, झोनल अधिकारी रोहिदास राठोड, स्मार्ट सिटी प्रकल्प व्यवस्थापक माईन हसन उपस्थित होते.

## सिमेंट रस्त्यात अडकलेली साडेआठ हजारांवर झाडे मोकळी उर्वरित हजारावर झाडे होणार आठवडाभरात मुक्त

नागपूर : शहरात सुरू असलेल्या सिमेंट रस्त्यांच्या कामात कंत्राटदारांच्या बेजबाबदारपणामुळे अडकलेल्या दहा हजारांवरील झाडांपैकी तब्बल ८६९७ झाडांचे बुंधे मोकळे करण्यात मनपा प्रशासनाला यश आले आहे. आता केवळ हजारावर झाडे शिल्लक असून येत्या आठवड्यात त्यांची बुंधे मोकळी करण्यात येणार आहेत.सिमेंट मार्गाच्या विळख्यातून बुंधे मोकळी करावयाच्या मोहिमेसंदर्भात आयुक्तांकडून वेळोवेळी बैठक घेउन आढावा घेण्यात येत आहे. यापुर्वी २८ मे रोजी झालेल्या आढावा बैठकीत आयुक्त अभिजीत बांगर यांनी दोन आठवड्यात शिल्लक ३७१८ झाडांची बुंधे मोकळी करण्याचे निर्देश दिले होते. आयुक्तांच्या निर्देशानुसार एका आठवड्यात १९४३ झाडांची बुंधे मोकळे करण्याची मनपा प्रशासनाने यशस्वी कामगिरी केली. १७७५ झाडे बुंधे मुक्त करण्यासाठी शिल्लक असून यापैकी सुमारे ७५० झाडे ही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील आहेत. वर्धा मार्ग, अमरावती मार्ग व छिंदवाडा मार्गावरील ही झाडे असून या झाडांची बुंधे मोकळे करण्यासंदर्भात वेळोवेळी मनपातर्फे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. मात्र अद्यापही कोणतिही कार्यवाही करण्यात आली नाही. मनपाच्या अखत्यारितील हजारावर झाडे शिल्लक असून या आठवड्यात उर्वरित सर्व झाडे सिमेंट रोडच्या विळख्यातून मुक्त करण्यात येतील, अशी माहिती प्रशासनातर्फे देण्यात आली आहे. सिमेंट रोडच्या बांधकामात शहरातील अनेक झाडांचे अस्तित्व धोक्यात आल्याची बाब लक्षात येताच आयुक्त अभिजीत बांगर यांनी गांभीर्याने दखल घेत धोक्यात असलेल्या झाडांच्या सर्वेक्षणाचे आदेश दिले. सर्वेक्षणाअंती शहरातील २५२३७ झाडांपैकी १४७६५ झाडे सुरक्षित आढळली. मात्र १०४७२ झाडांच्या अस्तित्वाला धोका असल्याचे दिसून आले. यावर तातडीने कार्यवाही करीत आयुक्त अभिजीत बांगर यांनी झाडांची बुंधे लवकरात लवकर मोकळे करण्याचे आदेश दिले. आयुक्तांच्या मार्गदर्शनात सुरू असलेली ही मोहिम अंतिम टप्प्यात असून शहरातील सर्व झाडे मोकळा श्वास घेउ शकणार आहेत.

## नदी, नाले स्वच्छता अभियानाच्या कामाची स्थायी समिती सभापतींकडून पाहणी



नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या वतीने सुरू असलेल्या नदी व नाले स्वच्छता अभियानाच्या निर्धारित कालावधीमध्ये काही दिवस शिल्लक असून थोडे कामच शिल्लक असले तरी कामामध्ये कोणतिही हलगर्जी होउ नये यासाठी महापौर, उपमहापौर, आयुक्तांकडून वेळोवेळी दौरा करून पाहणी करण्यात येत आहे. मात्र या कामाला गांभीर्याने घेत प्रशासनाकडून दररोजच स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे यांच्याकडून विविध ठिकाणी पाहणी करून कामाचा आढावा घेण्यात येत आहे. त्याअंतर्गत शनिवारी (ता.७) स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे यांनी पिवळी नदी स्वच्छता अभियानाच्या कामाची पाहणी केली.यावेळी आरोग्य समिती सभापती मनोज चापले, नगरसेवक गोपीचंद कुमरे, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. सुनील कांबळे, सहायक आयुक्त प्रकाश वराडे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. शुक्रवारी (ता.६) झालेल्या आढावा बैठकीमध्ये विविध भागातील नदी व नाले स्वच्छतेसंदर्भात काही तक्रारी स्थायी समिती सभापतींपुढे मांडण्यात आल्या. या तक्रारींवर गांभीर्याने दखल घेत शुक्रवार (ता.७) तातडीने संबंधित भागाचा दौरा करून स्थायी समिती सभापतींनी पाहणी केली व कामाबाबत आवश्यक निर्देश दिले. संतोषी नगर परिसरात असलेल्या नाल्यामध्ये हिरव्या वनस्पतीच्या साम्राज्यामुळे पाण्याच्या प्रवाहाला अडथळा होत असून त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होउ शकतो अशी तक्रार गुरुवार (ता.६)च्या बैठकीमध्ये करण्यात आली. याशिवाय इतर भागातीलही तक्रारी करण्यात आल्या होत्या. यावर दखल घेत स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे यांनी तातडीने स्वच्छतेचे काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

## आठ झोनच्या सभापतींची निवड अविरोध

### आसीनगर व मंगळवारी झोनसाठी मतदान : दोन सभापतींची पुनर्निवड

नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या दहाही झोनच्या सभापतींची निवड करण्यात आली. जिल्हाधिकारी तथा पीठासीन अधिकारी अश्विन मुदगल यांनी झोन सभापतींच्या निवडणुकीची प्रक्रिया पार पाडली. विशेष म्हणजे, मनपाच्या दहापैकी आठ झोनच्या सभापतींची निवड अविरोध झाली तर आसीनगर व मंगळवारी झोनसाठी मतदानप्रक्रिया राबवून सभापतींची निवड करण्यात आली. लक्ष्मीनगर व गांधीबाग झोनला विद्यमान सभापतींचीच पुनर्निवड करण्यात आली आहे.नगरसेवक प्रकाश भोयर (लक्ष्मीनगर), अमर बागडे (धरमपेठ), माधुरी ठाकरे (हनुमाननगर), लता काडगाये (धंतोली), समिता चकोले (नेहरूनगर), वंदना यंगटवार (गांधीबाग), अभिरूची राजगिरे (सतरंजीपुरा), राजकुमार साहु (लकडगंज), विरंका भिवगडे (आसीनगर), गार्गी चोपरा (मंगळवारी) या सदस्यांची झोन सभापती म्हणून निवड करण्यात आली. निवडणूक प्रक्रियेदरम्यान जिल्हाधिकारी तथा पीठासीन अधिकारी अश्विन मुदगल यांच्यासह मनपाचे अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, निगम सचिव हरीश दुबे, सहायक आयुक्त राजू भिवगडे, महेश मोरोणे, स्मिता काळे, प्रकाश वराडे, हरिश राऊत, गणेश राठोड आदी उपस्थित होते. महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते नवनिर्वाचित सभापतींचा सत्कार झोन सभापती निवडणुकीत निर्वाचित झालेल्या सत्तापक्षातील सर्व झोन सभापतींचा महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महापौर कक्षात आयोजित कार्यक्रमात स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, सत्तापक्ष उपनेत्या वर्षा ठाकरे, नगरसेवक वीरेंद्र सिंग, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल आदी उपस्थित होते.

## बाईक रॅलीद्वारे केली हिवताप प्रतिरोध जनजागृती

### महिनाभर 'एक दिवस एक कार्यक्रम'

नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या हिवताप व हत्तीरोग विभागातर्फे शासनाच्या हिवताप प्रतिरोध महिना जून कार्यक्रमांतर्गत शुक्रवारी (ता.७) गांधीबाग झोनमध्ये बाईक रॅलीद्वारे जनजागृती करण्यात आली. हत्तीरोग मुख्यालयातून सुरू झालेल्या बाईक रॅलीला आमदार विकास कुंभारे यांनी हिरवी झेंडी दाखवून सुरूवात केली. यावेळी मनपाचे आरोग्य समिती सभापती मनोज चापले, वैद्यकीय अधिकारी डॉ. बहिरवार, गांधीबाग झोनचे झोनल अधिकारी सुरेश खरे, हिवताप व हत्तीरोग अधिकारी जयश्री थोटे आदी उपस्थित होते.शासनाच्या हिवताप प्रतिरोध महिना जून कार्यक्रमांतर्गत 'एक दिवस एक कार्यक्रम' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत संपूर्ण जून महिनाभर दररोज विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. याद्वारे गांधीबाग झोनमध्ये बाईक रॅली काढून हिवतापासंदर्भात नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. मागील वर्षी डेंग्यू रुग्णांमध्ये गांधीबाग झोनमधील रुग्णांची संख्या सर्वाधिक असल्याचे दिसून आले. त्यामुळे जनतेमध्ये किटकजन्य आजाराबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने या भागाकडे विभागातर्फे विशेष लक्ष देत बाईक रॅली काढण्यात आली. रॅलीपूर्वी आमदार विकास कुंभारे यांनी सर्व उपपथकातील ३०० कर्मचा-यांना किटकजन्य आजाराबाबच्या सुरक्षेबाबत प्रतिज्ञा दिली. यावेळी किटकजन्य आजाराबाबत नारेही लावण्यात आले. यानंतर आमदार विकास कुंभारे यांनी रॅलीला हिरवी झेंडी दाखविली. यावेळी बाईक रॅली काढण्यात आलेल्या भागात हस्तपत्रिका, स्टीकर, पोस्टर आदींचे वितरण करून नागरिकांना हिवतापविषयक माहिती देण्यात आली. हत्तीरोग मुख्यालयातून सुरू झालेली बाईक रॅली टिळक पुतळा, अशोक चौक, रेशीमबाग, जगनाडे चौक, बजरंगनगर, कुंभारीटोला, बगडगंज, दिघोरिकर चौक, माटे चौक, बाबानानक नगर, स्वीपर कॉलनी, कुष्ठरोग वस्ती, जुनी मंगळवारी, गांडलेवाडा, जयसाववाडी, छापरूनगर, लकडगंज झोन कार्यालय, लकडगंज उद्यान, क्रेटा कॉलनी, पाटीदार भवन, लोहा मार्केट रामपेठ, सिटी पोस्ट ऑफीस, गांजाखेत, गोळीबार चौक, पाचपावली रेल्वे फाटक, फुटबॉल मैदान, मोतीबाग पूल, मोमीनपूरा पूल, दोसर भवन, राम मंदिर, संत्रा मार्केट, बजेरीया चौक, हज हाउस, गांधीपुतळा गंजीपेठ, चित्रा टॉकीज, जलालपुरा पोलिस चौकी, राजेंद्र शाळा, तुळशीबाग रोड, मानिपुरा चौक, शिवाजीनगर, भुतेश्वरनगर, लाकडी पूल, बडकस चौक मार्गे हत्तीरोग मुख्यालयात येत रॅलीचा समारोप झाला.



## प्रभातफेरी, पथनाट्य, सत्कार अन् स्वागतही

### मनपा शाळांत प्रवेश उत्सव : गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत, गणवेश आणि पुस्तकांचेही वाटप

नागपूर : मुलांना शाळेत येण्याची हुरहूर लागावी, आनंददायी शिक्षणातून शिक्षणाविषयी गोडी निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांचा उत्साह वाढावा यासाठी मनपा शाळांमध्ये बुधवारी (ता. २६) पहिल्याच दिवशी 'प्रवेश उत्सव' साजरा करण्यात आला. कुठे प्रभातफेरी निघाली, कुठे विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून जनजागृती केली, कुठे गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तर कुठे विद्यार्थ्यांचे आगळ्यावेगळ्या पद्धतीने स्वागत करून विद्यार्थ्यांना अनोखी भेट दिली. पहिल्याच दिवशी शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे शिक्षकांनी गुलाबपुष्प देऊन स्वागत केले तर विविध शाळांमध्ये पदाधिकारी, नगरसेवक आणि अधिकाऱ्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश आणि पुस्तकांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाने मनपा शाळांतील प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी शाळेचा पहिला दिवस अविस्मरणीय ठरला.'प्रवेश उत्सवा'चा मुख्य कार्यक्रम विवेकानंदनगर येथील विवेकानंदनगर माध्यमिक शाळेत पार पडला. शिक्षण समितीचे सभापती प्रा. दिलीप दिवे, उपसभापती प्रमोद तभाने, लक्ष्मीनगर झोनचे सभापती प्रकाश भोयर, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, शिक्षणाधिकारी प्रिती मिश्रीकोटकर, मुख्याध्यापिका रजनी वाघाडे, शाळा निरीक्षक संजय दिघोरे, शाळाप्रमुख श्री. दाभेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीमती भुवनेश्वरी, माध्यमिकचे श्यामकुमार शिव यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. उपस्थितांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गणवेश आणि पुस्तक वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना सभापती प्रा. दिलीप दिवे म्हणाले, विद्यार्थ्यांना शाळेचा कंटाळा येऊ नये तर शाळेविषयी आपुलकी आणि आस्था निर्माण व्हायला हवी. गेल्या काही वर्षांपासून विविध उपक्रमांच्या माध्यमातून आम्ही हाच प्रयत्न केला. आवश्यक ते बदल केले. यामुळे आता मनपा शाळांमध्ये पटसंख्या वाढू लागली आहे. यापुढे मनपा शाळांतून इंग्रजी माध्यम सुरू करण्याचा मानस असून लवकरच हा प्रस्ताव सत्यात उतरेल, असा मनोदय त्यांनी व्यक्त केला. शाळांच्या निकालाचा टक्का वाढविण्यासाठी शिक्षकांनी विशेष परिश्रम करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी पथनाट्यातून जनजागृती केली. यावेळी विद्यार्थ्यांसोबतच पालकांचाही सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले. संचालन जया दवे यांनी केले. आभार अर्चना बालेकर यांनी मानले. संजयनगर हिंदी माध्यमिक शाळा, दत्तात्रयनगर माध्यमिक शाळा, दुर्गानगर प्राथमिक शाळा, वाल्मिकीनगर शाळा, जयताळा माध्यमिक शाळा, शिवणगाव माध्यमिक शाळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक शाळा, बॅरिस्ट शेषराव वानखेडे माध्यमिक शाळा, बस्तरवारी माध्यमिक शाळा, डॉ. राममनोहर लोहिया माध्यमिक शाळा, सुरेंद्रगड माध्यमिक शाळा, लाल बहादूर शास्त्री माध्यमिक शाळा, नेताजी मार्केट माध्यमिक शाळा, पन्नालाल देवाडिया माध्यमिक शाळा, सरस्वती तिवारी माध्यमिक शाळा, हंसापुरी माध्यमिक शाळा, शे.ब.गो.गो. माध्यमिक शाळा, कपिलनगर माध्यमिक शाळा, हाजी अब्दुल मस्जिद लिडर माध्यमिक शाळा, ताजाबाद उर्दु माध्यमिक शाळा, गंजीपेठ उर्दु माध्यमिक शाळा, साने गुरुजी माध्यमिक शाळा, कुंदनलाल गुप्ता माध्यमिक शाळा, एम.ए.के. आझाद माध्यमिक शाळा, कामगारनगर माध्यमिक शाळा, गरीब नवाजनगर माध्यमिक शाळा, पेंशन नगर माध्यमिक शाळा, पारडी मराठी उच्च माध्यमिक शाळा क्र. १, दुर्गानगर हिंदी प्राथमिक शाळा, जाटतरोडी हिंदी उच्च प्राथमिक शाळा, संजयनगर माध्यमिक शाळा, बिडीपेठ मराठी प्राथमिक शाळा, जानकीनगर मराठी प्राथमिक शाळा, भीमनगर मराठी प्राथमिक शाळा, जी.एम. बनातवाला शाया, एकात्मतानगर मराठी प्राथमिक शाळा आदी शाळांमध्येही पदाधिकारी, नगरसेवक आणि अधिकाऱ्यानच्या उपस्थितीत 'प्रवेश उत्सव' साजरा करण्यात आला.

# थोडक्यात...

## महापौरांनी जाणून घेतल्या नागरिकांच्या समस्या



नागपूर : नागपूर महानगरपालिकेच्या सतरंजीपुरा झोनमधील प्रभग २१ येथील नागरिकांच्या समस्यांवर पुकारण्यात आलेले आंदोलन मागे घेण्यात आल्यानंतर सोमवारी (ता.२४) महापौर नंदा जिचकार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण दटके, जलप्रदाय समिती सभापती विजय झलके यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. नागरिकांच्या समस्यांवर संबंधित अधिका–यांना तातडीने कार्यवाही करण्याबाबतही निर्देश यावेळी देण्यात आले.नागरिकांच्या पाण्याच्या समस्येवर ज्येष्ठ नगरसेविका आभा पांडे यांनी जलत्याग आंदोलन पुकारले होते. रविवारी (ता.२३) ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण दटके यांनी नागरिकांच्या समस्यांबाबत चर्चा करून त्या सोडविण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. त्यानुसार सोमवारी (ता.२४) सतरंजीपुरा झोन कार्यालयात ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण दटके यांच्या नेतृत्वात नागरिकांच्या समस्या जाणून घेण्याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीमध्ये महापौर नंदा जिचकार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, विरोधी पक्षनेते तानाजी वनवे, जलप्रदाय समिती सभापती विजय झलके, उपसभापती भगवान मेंढे, झोन सभापती अभिरूची राजगिरे, ज्येष्ठ नगरसेविका आभा पांडे, नगरसेवक रमेश पुणेकर, नगरसेवक नितीन साठवणे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) श्वेता बॅनर्जी यांच्यासह ओसीडब्ल्यूचे अधिकारी व डेलिगेट्स उपस्थित होते. यावेळी विविध भागात राहणा–या नागरिकांनी भेडसावणा–या समस्या महापौर नंदा जिचकार व सर्व मान्यवरांपुढे मांडल्या. सर्व समस्या लक्षात घेता त्याबाबत तातडीने उपाययोजना करून आवश्यक ती कार्यवाही लवकरात लवकर करण्याचे निर्देश याप्रसंगी महापौर नंदा जिचकार यांनी संबंधित अधिका–यांना दिले.

## तंबाखू नियंत्रणासाठी एम्सचा पुढाकार

### मनपा व टाटा ट्रस्टच्या सहकार्याने वैद्यकीय अधिका–यांसाठी कार्यशाळा

नागपूर : तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाने वाढते कॅन्सरचे (कर्करोगाचे) प्रमाण ही गांभीर्याची बाब आहे. वैद्यकीय अधिका–यांकडून समाजामधील रुग्णांच्या उपचारासह या धोकादायक आजारापासून बचावाबाबत समाजामध्ये जनजागृती व्हावी, या उद्देशासह नागपूर महानगरपालिका व टाटा ट्रस्टला सहकार्य दर्शवित अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान नागपूर (एम्स)ने पुढाकार घेतला आहे.नागपूर महानगरपालिका आरोग्य विभाग व टाटा ट्रस्टच्या वतीने मनपातील सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी तंबाखू नियंत्रणाबाबत क्षमता निर्माण कार्यशाळेचे आयोजन सिव्हील लाईनमधील हॉटेल हेरिटेज येथे करण्यात आले. भारतीय आयुर्विज्ञान संस्थान नागपूर (एम्स)च्या मेजर जनरल डॉ. विभा दत्त यांच्या मार्गदर्शनात आयोजित कार्यशाळेमध्ये प्रमुख अतिथी म्हणून मनपाचे अतिरिक्त आयुक्त राम जोशी, आरोग्य विभाग उपसंचालक डॉ. के.बी.तुमाने, आरोग्य अधिकारी डॉ. सरीता कामदार, अतिरिक्त आरोग्य अधिकारी डॉ. विजय जोशी आदी उपस्थित होते. एकदिवसीय कार्यशाळेमध्ये सहभागी मनपाच्या सर्व वैद्यकीय अधिका–यांना यावेळी एम्सच्या सामुदायिक आरोग्य विभागाच्या (लेर्ािपळीू ाशवळलळपश) अधिका–यांमार्फत मार्गदर्शन करून त्यांच्या शंकांचे समाधान करण्यात आले. संपूर्ण देशासह नागपूर शहरातही तंबाखूजन्य पदार्थांचा प्रभाव वाढत आहे. त्याचा परिणाम विविध स्वरूपाच्या कॅन्सरच्या रूग्णांची संख्या वाढत आहे. या परिस्थितीमध्ये वैद्यकीय अधिका–यांनी जागरुक असणे आवश्यक आहे. रुग्णांच्या उपचारासह त्यांचे समुपदेशनही होणे महत्वाचे आहे. रुग्णांचा उपचार करून त्यांना धोकादायक आजारापासून बरे करण्यामध्ये एम्स नागपूरचे मोठे योगदान राहिले आहे. मात्र केवळ रुग्ण बरे करणे हाच उद्देश न ठेवता तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाचे प्रमाण कमी करण्यासाठी समाजामध्ये जागरूकता निर्माण होणे आवश्यक आहे. ही जागृती निर्माण करण्यात डॉक्टरांची भूमिका महत्वाची आहे. यासाठी तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाने होणा–या आजारावरील उपचारांसह त्याबाबत समाजात जागृती व्हावी हा उद्देश पुढे ठेवून वैद्यकीय अधिका–यांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

## पर्यावरणप्रेमींनी पर्यावरण संवर्धनाची चळवळ उभारावी : महापौर नंदा जिचकार

### महापौर वृक्षमित्र, जलमित्र ओळखपत्रांचे वाटप : पर्यावरण रक्षणासाठी मनपाचा पुढाकार



नागपूर : सिमेंट रस्ते आणि विकासकामांमुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामाची दखल घेत नागपूर महानगरपालिकेने मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवडीचा ध्यास घेतला आहे. यासोबतच भविष्यात नागपूर शहरावर जलसंकट येऊ नये म्हणून जलसंवर्धनाची जबाबदारीही काळाची गरज आहे. यासाठी पर्यावरणप्रेमी आणि जागरुक नागरिकांच्या माध्यमातून वृक्षसंवर्धन आणि जलसंवर्धनाची चळवळ उभी करणे काळाची गरज आहे. वृक्षमित्र आणि जलमित्रांच्या माध्यमातून ही चळवळ उभी होईल आणि नागपूर शहर संपूर्ण महाराष्ट्रात आदर्श ठरेल, असा विश्वास महापौर नंदा जिचकार यांनी व्यक्त केला.नागपूर महानगरपालिकेच्या वतीने वृक्ष आणि जलसंवर्धनाच्या क्षेत्रात व्यापक कार्य व्हावे आणि जनजागृती व्हावी यासाठी वृक्षमित्र आणि जलमित्र बनण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत नागपूर शहरातील पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांनी वृक्षमित्र आणि जलमित्र बनण्यासाठी महापौर कार्यालयात नोंदणी केली. नोंदणी केलेल्यांना महापौर कार्यालयात महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाला शिक्षण समितीचे सभापती प्रा. दिलीप दिवे, जलप्रदाय समितीचे सभापती पिंटू झलके, ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, प्रतोद दिव्या धुरडे, नगरसेविका रूपा रॉय, उद्यान अधीक्षक अमोल चौरपगार, मेयर इनोव्हेशन कौन्सीलचे कन्वेनर डॉ. प्रशांत कडू उपस्थित होते. पुढे बोलताना महापौर नंदा जिचकार म्हणाल्या, नागपूर महानगरपालिकेने वृक्ष आणि जलसंवर्धनासाठी पुढाकार घेऊन केलेल्या आवाहनाला शेकडो नागरिकांनी प्रतिसाद दिला. नागपूर महानगरपालिकेचे प्रतिनिधी म्हणून वृक्षमित्र आणि जलमित्रांची जबाबदारी वाढली आहे. वृक्ष लागवडीसोबतच वृक्ष जगविण्याचा संकल्प महत्त्वाचा आहे. शहरातील पाणीसाठा वाढविण्यात जलमित्रांनी महत्त्वाची भूमिका बजावावी, असे आवाहन करीत यासाठी नागपूर महानगरपालिका आवश्यक ते सर्व सहकार्य करेल, असे आश्वासन महापौर नंदा जिचकार यांनी यावेळी दिले.

यावेळी उपस्थित वृक्षमित्र आणि जलमित्रांना महापौर नंदा जिचकार यांनी ओळखपत्रांचे वाटप केले.

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी घेतला विविध कामांचा आढावा



नागपूर : शहरात सुरू असलेल्या विविध विकास कामांचा केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शनिवारी (ता.२९) आढावा घेतला.वनामती येथे आयोजित आढावा बैठकीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह उपमहापौर दीपराज पार्डीकर, आमदार सुधाकर देशमुख, आमदार सुधाकर कोहळे, आमदार कृष्णा खोपडे, आमदार विकास कुंभारे, आमदार डॉ. मिलींद माने, स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, सत्ता पक्षनेता संदीप जोशी, ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण दटके, नागपूर मेट्रो कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक ब्रजेश दीक्षित, जिल्हाधिकारी अश्वीन मुदगल, मनपा आयुक्त अभिजीत बांगर, नागपूर सुधार प्रन्यासच्या सभापती शितल उगले, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे चंद्रशेखर, वनामतीचे संचालक व मनपाचे अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता उल्हास देबडवार, अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख यांच्यासह मनपा, मेट्रो व नागपूर सुधार प्रन्यासचे विविध विभागाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. बैठकीमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेची सद्यस्थिती, नागपूर सुधार प्रन्यासने मनपाला लेआउट हस्तांतरण करण्याबाबत घ्यावयाचा धोरणात्मक निर्णय, शहरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी ग्रीनजिम साहित्य उपलब्ध करण्याबाबत सद्यस्थिती अहवाल, शहरातील खेळांचे मैदान विकसीत करण्याबाबतची सद्यस्थिती, शहरात 'साई' प्रकल्पाच्या जमीनीबाबत धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करणे, शहरात यशवंत स्टेडियम, सक्करदरा बाजार, बुधवार बाजार, सोख्ता भवन, भाजी मार्केट बाबत सद्यस्थिती, शहरातील सिमेंट रस्ते, चौक सौंदर्यीकरण, वृक्ष लागवड याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे, केळीबाग रोड, जुना भंडारा रोड, पारडी उड्डाणपूल येथील रस्त्यांच्या भूसंपादनाबाबत सद्यस्थिती अहवाल, शहरातील अमृत योजनेच्या कामाची सद्यस्थिती अहवाल, शहरातील झोपडपट्टीवासीयांना मालकी हक्काचे पट्टे देण्याबाबत सद्यस्थिती अहवाल, शहरातील कचरा व्यवस्थापन व इंदूर पॅटर्नबाबत सद्यस्थिती अहवाल, नाग नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पाबाबत सद्यस्थिती अहवाल, नागपूर मेट्रो रेल्वेच्या कामाबाबत सद्यस्थिती तसेच नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून मेट्रोला हस्तांतरीत करण्यात आलेल्या प्रकल्पांच्या हस्तांतरण कराराची सद्यस्थिती, ऑरेंज सिटी स्ट्रीट प्रकल्पाबाबत सद्यस्थिती, फुटाळा तलावात जलक्रीडा प्रकल्प चालविण्याबाबत सद्यस्थिती आदी विषयांचा यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आढावा घेतला. प्रत्येक व्यक्तीचे स्वत:च्या घराचे स्वप्न असते त्यासाठी शहरात प्रधानमंत्री आवास योजनेतून ५० हजार घरे बांधण्याचे लक्ष्य आहे. यामध्ये येणा–या त्रुट्या दूर याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिले. नागपूर सुधार प्रन्यासने मनपाला लेआउट हस्तांतरण करण्याच्या विषयाबात जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त व नागपूर सुधार प्रन्यासच्या सभापतींनी योग्य निर्णय घेउन विषय पूर्णत्वास नेण्याचेही त्यांनी निर्देशित केले. शहरात ज्येष्ठ नागरिकांसाठी पहिल्या टप्प्यात २८ ठिकाणी ग्रीन जिम साहित्य लावण्याचे काम पूर्ण झाले आहे. तर दुस–या टप्प्यात २८ ठिकाणी साहित्य लावण्याचे काम सुरू असून उर्वरित सर्व ठिकाणी १५ ऑगस्टपर्यंत काम पूर्ण करण्याचेही निर्देश ना. नितीन गडकरी यांनी दिले.

## 'आपली बस'च्या ताफ्यात 'मिनी बस'चे पदार्पण

### आमदार कृष्णा खोपडे यांच्या हस्ते सहा बसचे लोकार्पण



नागपूर : नागपुरातील वस्त्यांमध्ये 'आपली बस' पोहचावी आणि प्रवाशांचा प्रवास सुखकर व्हावा, या हेतूने नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाच्या वतीने 'आपली बस'च्या ताफ्यात मिनी बस दाखल करण्यात आली. सहा मिनी बसचे लोकार्पण आमदार कृष्णा खोपडे यांच्या हस्ते करण्यात आले.सतरंजीपुरा चौक येथे आयोजित कार्यक्रमात स्थायी समितीचे सभापती प्रदीप पोहाणे, परिवहन समितीचे सभापती बंटी कुकडे,सदस्य नितीन साठवणे, संजय महाजन,सतरंजीपुरा झोन सभापती अभिरुची राजगिरे, नेहरू नगर झोन सभापती समिता चकोले, नगरसेविका मनिषा कोठे, परिवहन व्यवस्थापक शिवाजी जगताप, प्रशासकीय अधिकारी रवींद्र पागे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आमदार कृष्णा खोपडे, स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, परिवहन सभापती बंटी कुकडे यांनी फीत कापून 'मिनी बस'चे लोकार्पण केले. पारडी आणि बर्डी या मार्गावर धावणाऱ्या बसमध्ये लोकार्पणानंतर सर्व मान्यवरांनी प्रवास केला. उपस्थित नागरिकांनीही बसमध्ये प्रवास केला. कार्यक्रमाला मनपाचे पदाधिकारी, अधिकारी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गोरेवाडा तलावाच्या कार्यात पहिले यश

नागपूर : शहरातील पाणी टंचाईचा प्रश्न लक्षात घेता नागपूर महानगरपालिकेने सुरू केलेल्या गोरेवाडा तलावाच्या खोलीकरण कार्याला रविवारी (ता.२३) पहिले यश मिळाले आहे. युध्दपातळीवर सुरू असलेल्या तलाव खोलीकरणामुळे पाणी लागले आहे.शहरातील पाण्याच्या प्रश्नावर गांभीर्याने कार्य व्हावे यासाठी तीन दिवसापासून सुरू असलेल्या खोलीकरण कार्याकडे स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे विशेष लक्ष देत आहेत. सदर कामाची दररोज पाहणी करून ते आढावा घेत आहेत. नुकत्याच करण्यात आलेल्या पाहणी दौ–यात स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे यांच्या समवेत नागपूर सुधार प्रन्यासचे विश्वस्त भूषण शिंगणे, सर्वश्री मनोज अग्रवाल, हर्षद घाटोळे, अश्विन खवाले, किशोर रावत, सुनील गवाडे, विठ्ठल अधावे, संजय गिरहें, रेखा देने, ॲड. श्रीकांत परवटलवार आदी उपस्थित होते. मागील शंभर वर्षांमधे पहिल्यांदाच गोरेवाडा तलाव पूर्ण आटले. शहराला पाणी पुरवठा करणा–या तलावाची ही स्थिती भविष्यासाठी धोक्याची घंटा आहे. भविष्यात शहरातील नागरिकांना पाणी टंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी तलावाचे खोलीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. मागील तीन दिवसापासून युध्दपातळीवर तलावाच्या खोलीकरणाचे काम सुरू आहे व या कामाचा सातत्याने आढावा घेण्यात येत आहे. पदाधिका–यांसह मनपाचे अधिकारी आणि कर्मचारी गोरेवाडा तलावाच्या खोलीकरण कार्यासाठी परिश्रम घेत आहेत. लवकर हे काम पूर्ण व्हावे यासाठी मनपा कटिबध्द आहे.

### खोलीकरणानंतर लागले पाणी : कार्य युध्दपातळीवर सुरू



## जरीपटका परिसरात केला वीज बचतीचा जागर




नागपूर : ऊर्जा बचत ही काळाची गरज आहे. त्यासाठी अनावश्यक वीज वापरण्यावर स्वत:हूनच बंधने आणायला हवी. दैनंदिन वापरात अनावश्यक वीज दिवे बंद केल्यास ऊर्जा बचतीत प्रत्येकाचा हातभार लागू शकतो. पोर्णिमा दिवस हा उपक्रम ऊर्जाबचतीच्या दृष्टीने महत्वाचे पाऊल आहे. नागपूरची या उपक्रमामुळे वेगळी ओळख तयार झाली आहे. त्यामुळे नागपुरातील प्रत्येक नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन ऊर्जा बचतीचा नवा आदर्श घालून द्यावा, असे आवाहन मनपाचे अधिकारी आणि ग्रीन व्हिजीलच्या स्वयंसेवकांनी केले.जरीपटका चौकातील जिंजर मॉल येथे पोर्णिमा दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. महापौर नंदा जिचकार आणि मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांच्या मार्गदर्शनात मनपाच्या उपअभियंता कल्पना मेश्राम आणि मंगळवारी झोनचे शाखा अभियंता एन.बी. सालोडकर आणि ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कौस्तभ चॅटर्जी यांच्या नेतृत्वात मनपा कर्मचारी आणि ग्रीन व्हिजील फाऊंडेशनच्या स्वयंसेवकांनी जिंजर मॉलमधील व्यापाऱ्यांना अनावश्यक वीज दिवे रात्री ८ ते ९ या वेळात बंद करण्याचे आवाहन केले. आवाहनाला प्रतिसाद देत व्यापाऱ्यांनी अनावश्यक वीज दिवे बंद करीत विधायक उपक्रमात सहभाग नोंदविला. मनपाच्या वतीनेही परिसरातील अनावश्यक पथदिवे बंद करण्यात आले होते. ग्रीन व्हिजीलचे संस्थापक कौस्तभ चॅटर्जी यांच्यासह ग्रीन व्हिजीलच्या सुरभी जैस्वाल, मेहुल कोसुरकर, शीतल चौधरी, दादाराव मोहोड, दिगांबर नागपुरे यांनी पोर्णिमा दिवस उपक्रमाच्या माध्यमातून व्यापारी व नागरिकांमध्ये जनजागृती केली.



## सुदृढ आरोग्यासाठी नियमित योगसाधना करा : ना. नितीन गडकरी

### विश्व योग दिनानिमित्त यशवंत स्टेडियमवर उसळली योगसाधकांची गर्दी

नागपूर : आज विज्ञानाने कितीही प्रगती केली असली तरी आपल्या आरोग्याची काळजी घेणे हे आपल्याच हातात आहे. अनेक वर्षांपूर्वी जनार्दन स्वामींनी योगसाधना करून आपल्यासाठी महत्वाचा ठेवा उपलब्ध करून ठेवला त्याचा फायदा आजही आपल्याला होत आहे. योग हे केवळ इतरांना दाखवायचे प्रात्याक्षिक नसून तो सुदृढ आरोग्याचा ठेवा आहे. त्यामुळे सुदृढ आरोग्यासाठी प्रत्येकाने नियमीत योगसाधना करावी, असे आवाहन केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक, महामार्ग आणि सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.विश्व योग दिनाच्या निमित्ताने नागपूर महानगरपालिका व नेहरू युवा केंद्र संगठन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि शहरातील विविध योग मंडळ व संस्थांच्या सहकार्याने शुक्रवारी (ता.२१) यशवंत स्टेडियम येथे भव्य आयोजन करण्यात आले होते. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी बोलत होते. मंचावर महापौर नंदा जिचकार, उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे, विरोधी पक्षनेते तानाजी वनवे, जिल्हाधिकारी अश्विन मुदगल, मनपा आयुक्त अभिजीत बांगर, जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळाचे कार्यवाह रामभाऊ खांडवे यांच्यासह मनपाचे पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले, सुदृढ आरोग्य हा निरामय जीवनाचा ठेवा आहे. सुदृढ आणि स्वस्थ आरोग्य हीच प्रत्येकाची खरी संपत्ती आहे. त्यामुळे आपल्या आरोग्याप्रती प्रत्येकाने सजग राहणे आवश्यक आहे. आजच्या धावपळीच्या युगात योगाचे महत्व लक्षात घेउनच संयुक्त राष्ट्रसंघाने २१ जून हा जागतिक योग दिन म्हणून घोषित केला आहे. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या आरोग्यासाठी नियमीत योग करावा, असेही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले. यावेळी विविध योगाभ्यासी मंडळाच्या चिमुकल्यांपासून ते ज्येष्ठ योग साधकांनी उत्कृष्ठ प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाची सुरुवात योगसुत्र वे ऑफ लाईफ यांच्या प्रात्यक्षिकाद्वारे झाली. यानंतर ओशोधारा संघाच्या परविंदर सिंग यांनी हँड पॅन प्लेईंग चे सादरीकरण केले. नागपूर जिल्हा योग अशोसिएशन, श्री. योग साधना केंद्र, आंतरराष्ट्रीय योगपटू धनश्री लेकुरवाळे व त्यांच्या चमुने संगीताच्या तालावर योगाचे चित्तथरारक आसने सादर केली. जनार्दन स्वामी योगाभ्यासी मंडळाद्वारे ईश्वर प्रणिधान, उत्थित विवेकासन आणि योगासन (प्राणायाम)चा सामुहिक अभ्यास झाला. सहजयोग ध्यान केंद्राच्या ध्यानाने कार्यक्रमाची सांगता झाली. मैदानात शुभ्र वस्त्र परिधान केलेल्या हजारो योग साधकांनीही उत्स्फुर्त प्रतिसाद दर्शविला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमहापौर दीपराज पार्डीकर यांनी केले. संचालन ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी यांनी केले तर आभार शिक्षण समिती सभापती दिलीप दिवे यांनी मानले.